# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3847 / शि.वि. / 2015
दि.12 / 03 / 2015

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :– शैक्षणिक अधिकार कायदाबाबत जागरूकता मोहीम राबविण्याकरीता व ऑन लाईन एडमिशन करीता सेंटर सुरू करण्याबाबत.**

संदर्भ :– शैक्षणिक अधिकार जागरूकता मंच, डॉ. बाबासाहेब आबेंडकर सांस्कृतिक सभागृह, उरवेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर यांचे दि.09.03.2015 चे पत्रान्वये.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अंतर्गत मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना खाजगी शाळेत 25% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या राखीव जागेवर प्रवेश देण्याकरीता महाराष्ट्र शासनातर्फे ऑन लाईन प्रवेश याबाबत जन मानसात जन जागृती करण्याकरीता व ऑन लाईन प्रवेशाकरीता जनतेसाठी सहाय्यता केंद्र सुरू करण्यात आले असून शैक्षणिक अधिकार जागरूकता मंच, डॉ. बाबासाहेब आबेंडकर सांस्कृतिक सभागृह, उरवेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर यांचेतर्फे विविध ठिकाणी मोफत मार्गदर्शक केंद्र सूरू करण्यात आले आहे. आपल्या शाळेत उपरोक्त संस्थेच्या मदतीने प्रवेश प्रक्रिया सुरू असेपर्यंत अस्थायी मदतकेंद्र सूरू करावे. विद्यार्थ्यांचे पालक, परीसरातील मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील गरजू पालक यांना याबाबत सूचित करून मोफत मार्गदर्शन केंद्रात जावून आपल्या पाल्यांसाठी मोफत ऑन लाईन प्रवेश अर्ज भरावा याबाबत सूचना देण्यात याव्या.

संपर्क :– श्री.नितीन फुलमाळी – 9028303146
श्री.वासूबंधू – 8600140656

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका नागपूर**

**प्रतिलिपी –**

1. मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर.
2. शैक्षणिक अधिकार जागरूकता मंच, डॉ. बाबासाहेब आबेंडकर सांस्कृतिक सभागृह, उरवेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर